# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com

डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष - २०१५


**तात्काळ/महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/ C.9

दिनांक :- 10 JAN 2017

प्रति,

**प्राचार्य,**

पदविका/पदवी व पदव्युत्तर

अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय — तंत्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये हमीपत्रावर तसेच मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये सन २०१२ ते सन २०१६ या कालावधीत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची माहिती सादर करणेबाबत.**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१७/१५ दिनांक ०७/०१/२०१७

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, संचालनालयामार्फत तंत्रशिक्षणाशी संबधित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. या प्रवेश प्रक्रियांमध्ये शासनाच्या निर्देशनानुसार मागास प्रवर्गातील उमेदवारांना आरक्षणाचे धोरण अलंबण्यात येत असून शासनाने दिलेल्या निर्देशानुसार ज्या मागास प्रवर्गातील उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याच्या अटीच्या अधीन राहून व तसे रुपये १००/- च्या लेखी हमीपत्र सादर करून प्रवेश घेण्याची तरतूद आहे. त्या नुसार मागास प्रवर्गातील उमेदवारांना हमीपत्र घेऊन प्रवेश देण्यात आलेले आहेत.

संदर्भिय पत्रान्वये अनुसूचित जमातीच्या ज्या उमेदवारांना हमीपत्रावर तसेच मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये प्रवेश दिलेला आहे. अशा आपल्या संस्थेतील सन २०१२-१३ पासून ते सन २०१६-१७ पर्यंतच्या प्रवेशीत उमेदवारांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात (Excel) मध्ये भरून दिनांक १३/०१/२०१६ पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

(महेश शिवर्णकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनलाय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

प्रपत्र अ

तंत्रशिक्षण महाविद्यालया मध्ये हमीपत्रावर तसेच मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये सन २०१२ ते सन २०१६ या कालावधीत अनुसुचित जातीच्य जागेवर प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांबाबतची माहीती.

| अ.क्र | विद्यार्थ्याचे नाव | दावा केलेली जमात | प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे नाव | प्रवेशाचे वर्ष | हमी पत्रावर/मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये सादर केलेले कागदपत्राचा क्रमांक व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

प्राचार्य,